# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०१ ऑक्टेंबर, २०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन गडचांदुर अंतर्गत फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस ३०/०९/२०१९ रोजी **श्रीमती स.ज. अंसारी, जिल्हा सत्र न्यायाधीश क्र. ०१, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन गडचांदुर अंतर्गत मौजा भोयेगाव येथे दिनांक २५/०४/२०१७ रोजी यातील फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी ही आपल्या घराबाहेर खेळत असतांना यातील **आरोपी नामे सुरेश शालीकराव पवार वय १९ वर्ष रा. भोयेगाव ता. कोरपना** याने तिला आपले घरी बोलावुन तिच्या अल्पवयाचा फायदा घेवुन तिचेवर लैंगीक अत्याचार केला. अशा फिर्यादीच्या रिपोटवरून पोलीस स्टेशन गडचांदुर येथे अप.क्र. २०३/२०१७ कलम ३७६,(२)(आय)(जे) भांदवि सहकलम ४,५,(एम) ६ लै.अ.बा.स. अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपासादरम्यान तत्कालीन सहायक पोलीस निरिक्षक विनोद रोकडे पोलीस स्टेशन गडचांदुर, यांनी गुन्हयातील आरोपीस अटक करून आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ३०/०९/२०१९ रोजी **आरोपी नामे सुरेश शालीकराव पवार वय १९ वर्ष रा. भोयेगाव ता. कोरपना** यास **कलम ३७६(२)(आय)भादंवि सहकलम ४,६ पोक्सो मध्ये १० वर्ष शिक्षा व २,०००/—रू दंड, न भरल्यास ६ महिने शिक्षा श्रीमती स.ज. अंसारी, जिल्हा सत्र न्यायाधीश क्र. ०१, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. डि.व्ही. महाजन, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा. विलास वासाडे, पोलीस स्टेशन गडचांदुर यांनी काम पाहिले.

———————————————————————————————

# प्रतिष्ठा महाबचत निधी लिमिटेड मध्ये गुंतवणुक करणाऱ्या ग्राहकांना चंद्रपुर पोलीसांतर्फे सुचना

चंद्रपुर जिल्हयात प्रतिष्ठा महाबचत निधी लिमिटेड मध्ये ग्राहकांची फसवणुक झाल्याबाबत पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे अप.क्र. ११११९/२०१८ कलम४०६,४२०,३४ भादंवि सहकलम ३ एमपीआयडी ॲक्ट १९९९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास हा आर्थिक गुन्हे शाखा चंद्रपुर यांचे कडे सोपाविण्यात आला असुन, पुढिल तपासाकरीता ज्या गुंतवणुकदारांनी या संस्थेत गुंतवणुक केली आहे त्यांची बयाण नोंदणी सुरू असल्याने गुंतवणुकदारांना सुचित करण्यात येते की बयाण नोंदणी करीता तात्काळ आर्थीक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपुर येथे संपर्क साधावा.

संपर्क क्रमांक **07172-273258**

---